जा.क्र.कृ.सं.कें.शि/जडवस्तू संग्रह लिलाव/589/२०२२
कृषि संशोधन केंद्र, शिरगाव, रत्नागिरी
दिनांक : 17 NOV 2022

प्रति,

..........................................,
..........................................,
..........................................

**विषय** : कार्यालयीन निरुपयोगी जडवस्तू खरेदी करणेचे दरपत्रक देणेबाबत.....

महोदय,

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी, अंतर्गत प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी येथील कार्यालयीन निरुपयोगी जडवस्तूची विक्री दि. १२/१२/२०२२ रोजी करण्यात येणार आहे. सदर बाबतची सिलबंद दरपत्रके दि.०९/१२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत कार्यालयात स्विकारण्यात येतील. दरपत्रके विक्रीच्या दिवशी दुपारी ११.०० वाजता उपस्थित दरपत्रक धारकासमोर उघडणेत येतील. दरपत्रकासाठी आवश्यक कोरे अर्ज व अटी व शर्तीची माहिती, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० या वेळेत उपलब्ध होतील. कोऱ्या अर्जाची किंमत रु. १००/—(रु. शंभर मात्र) असून रु. १०००/—(रु. एक हजार मात्र) अनामत रक्कम दरपत्रकासोबत रोखीने देणे आवश्यक आहे. विक्रीसाठी ठेवलेले निरुपयोगी जडवस्तू साहित्य सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष पाहता येईल.

आपला विश्वासू,
१७.११.२०२२

**प्रभारी अधिकारी,**
कृषि संशोधन केंद्र,
शिरगाव, रत्नागिरी

प्रत: प्रसिध्दीसाठी रवाना

१) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली यांना विनंती करण्यात येते की, वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करुन मिळावी.
२) मा. प्रमुख, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र akmudbskkv@gmail.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
३) कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी (कार्यालयीन नोटीस बोर्ड)
४) ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, शिरगांव, रत्नागिरी.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

**कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी,**

कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी येथील निरुपयोगी जडवस्तू विक्री बाबतच्या
अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १. | निरुपयोगी जडवस्तू विक्रीबाबतच्या अटी व दरपत्रक भरण्याचे विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. दरपत्रकासोबत दरपत्रक भरणाऱ्यांनी अनामत रक्कम म्हणून रु. १०००/–(रु. एक हजार मात्र) एवढी रक्कम रोखीने भरावयाची आहे. |
| २. | विक्री करावयाच्या जडवस्तू कार्यालयीन वेळेत सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० या वेळेत प्रत्यक्ष पाहता येतील. |
| ३. | प्रक्षेत्रावरील विक्री करावयाचे एकूण ४६ नग जडवस्तू (विविध योजनेच्या) आहेत. |
| ४. | दरपत्रकधारकाने दरपत्रकात दर्शविलेल्या किमती शिवाय इतर काही कर असल्यास ते संबंधित दरपत्रकाधारकानेच भरावयाचे आहे. |
| ५. | दरपत्रक सादर करताना दरपत्रकधारकाने घातलेली कोणतीही अट स्विकारली जाणार नाही. |
| ६. | सिलबंद दरपत्रकाच्या पाकिटावर 'निरुपयोगी जडवस्तूसाठी दरपत्रक' असे नमुद करावे. त्याखाली या कार्यालयाचा पत्ता असावा. पाकिटाच्या मागच्या बाजूस दरपत्रकाधारकाचे संपूर्ण नावं, पत्ता व मोबाईल क्रमांक लिहावा. तसेच दरपत्रकासोबत आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ७. | दरपत्रके दि.०९/१२/२०२२ रोजी १०.३० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील आणि प्राप्त दरपत्रके विक्री च्या दिवशी दि. १२/१२/२०२२ रोजी ११.०० वा. उपस्थित दरपत्रकाधारकासमोर उघडण्यात येतील. |
| ८. | सिलबंद दरपत्रकांद्वारे वाजवी/अपेक्षित किंमत न आल्यास दरपत्रक उघडल्यानंतर लगेच उपस्थित दरपत्रक धारकांसमोर वस्तूची विक्री तोंडी बोलीद्वारे करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवला आहे. |
| ९. | दरपत्रके उघडल्यानंतर गटनिहाय पहिल्या तीन क्रमांकाच्या दरपत्रकाधारकांची अनामत रक्कम राखून ठेवून इतरांच्या रक्कमा त्वरीत परत करण्यात येतील. तसेच उरलेल्या अनामत रक्कम विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यावर परत करण्यात येतील. |
| १०. | मंजूर दरपत्रक धारकाने निरुपयोगी जडवस्तू नाकारल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ११. | दरपत्रक मंजूर झाल्यानंतर जडवस्तूची राखण दरपत्रकाधारकानेच करावयाची आहे. |
| १२. | स्वीकृत दरपत्रकात नमुद केलेल्या रक्कमेच्या ५०% रक्कम त्वरीत व शिल्लक ५०% रक्कम वस्तू ताब्यात घेण्यापूर्वी (सुट्टीचे दिवस वगळून) रोखीने भरावी. |
| १३. | एक किंवा सर्वच दरपत्रके तसेच तोंडी बोली कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. |
| १४. | मंजूर दरपत्रकाधारकाने खरेदी केलेल्या जडवस्तू चार दिवसाच्या आत प्रक्षेत्रावरुन संबंधीत अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली स्वखर्चाने विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे बंधनकारक आहे. |
| १५. | जडवस्तू विक्री यादी मध्ये जुना ट्रॅक्टर विक्री करणे आहे त्याचा खरेदी दर स्वतंत्रपणे देण्यात यावा. |

दिनांक :– 17 NOV 2022

**प्रभारी अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
शिरगांव, रत्नागिरी ४१५ ६२९